महाराष्ट्र शासन

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ; desk10@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

कार्यालयीन आदेश

क्र. क्रमांक - १०/एटीएस/२०२५/प्र.क्र.३३/३६

दिनांक :- ३०।०९।२०२५

विषय: राज्य शासनाच्या Maharashtra Apprenticeship Promotion Scheme - MAPS या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन वाटप करणेबाबत.

संदर्भ :
१. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. ०३.०६.२०२१
२. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन पत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७ /व्यशि-३, दिनांक २५.०१.२०२३
३. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन पुरकपत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३, दि. २०.०३.२०२३.

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी "महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)" कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३, दिनांक ०३/०६/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये ५,०००/- यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारी विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही.

मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु.२०/- प्रतितास या दराने(केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु.१५/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु.२,५००/- एवढी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

तसेच ज्या मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु.२०/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त ५०० तासांकरिता रु. १०,०००/- एवढी प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रतिवर्षी १,००००० शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षित करून या योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.२५८/ व्यशि-३, दि.२५.१०.२०२१ अन्वये महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेचा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशिर्षे व संगणक सांकेतांक मंजूर करुन देण्यांत आलेला आहे.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, यांचे पत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७ /व्यशि-३, दिनांक २५.०१.२०२३ अन्वये महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (MAPS) राबविण्यासाठी योजनेचे संकेतस्थळ तात्काळ कार्यान्वित करण्याबाबतच्या सूचना संचालनालयास प्राप्त झाल्या आहेत.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन पुरकपत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. २०.०३.२०२३ सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात प्रलंबित विद्या वेतन हे ऑफलाईन पद्धतीने वितरित करण्यास मान्यता देण्यात आलेली असून दिनांक ०१.०४.२०२३ पासून ऑनलाईन पध्दतीने MahaDBT मार्फत विद्यावेतन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात रक्कम रु.३६,२५,०२,९००/- (रुपये छत्तीस कोटी पंचवीस लाख दोन हजार नऊशे फक्त) इतक्या प्राप्त निधीमधून आर्थिक वर्ष सन २०२१-२२ व २०२२-२३ मधील शिकाऊ उमेदवारांना रु.३६,२५,०२,८७०/- (रुपये छत्तीस कोटी पंचवीस लाख दोन हजार आठशे सत्तर फक्त) एवढ्या निधीचे ऑफलाईन पद्धतीने वाटप करण्यांकरीता देयके पारीत करुन घेण्यांत आलेली असून शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतनाचे वाटप करण्यांत आलेले आहे.

संचालनालया मार्फत सर्व मूलभूत तथा अनुषंगिक सूचना केंद्र याना महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजनेच्या पात्र लाभार्थ्यांची यादी देण्यात आली आहे प्रादेशिक कार्यालय पुणे यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या २६७७२० आहे. प्रादेशिक कार्यालय नाशिक यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या ६४०६० आहे. प्रादेशिक कार्यालय मुंबई यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या १४९२१६ आहे. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या १७५२१ आहे. प्रादेशिक कार्यालय नागपूर यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या २९८६१ आहे.प्रादेशिक कार्यालय अमरावती यांचे पात्र लाभार्थ्यांची संख्या १००५७ आहे.

सद्यस्थितीत रुपये ६०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला असून रुपये ९०. ९५ कोटी इतका निधी बीम्स प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. वरीलपैकी रुपये ६०.७२कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला असून रुपये ३०.२३कोटी इतका निधी शिल्लक आहे. मार्च २०२५ अखेर रुपये ५००कोटी निधी खर्च करणे आवश्यक आहे.

सदर maps.dvet.gov.in पोर्टलवर दरमहा माहिती (महिनानिहाय Monthwise) भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. त्याअनुषंगाने maps.dvet.gov.in पोर्टलवर शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ व

२०२२-२०२३,२०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या तसेच डिसेंबर २०२४ पर्यंत शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या सर्व शिकाऊ उमेदवारांनी २५मार्च २०२५ अखेर नोंदणी करून क्लेम सादर करणे आवश्यक आहे २५ मार्च २०२५ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व अशा शिकाऊ उमेदवारांना महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत देय विद्यावेतन अदा केले जाणार नाही.

याबाबत संबधित सर्व शिकाऊ उमेदवारांना कळविण्यांबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रांना तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील आस्थापनांना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत यावा.

(सतिश सुर्यवंशी)
संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य ,मुंबई

प्रत : १.संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कार्यालय यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

२. संबंधित सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

3. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर. यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.